# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 24/12/2022 (शनिवार) सकाळ

## जबरी चोरी

**पो.स्टे. बेला** :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील आरोपीचे राहते घरी सालईराणी येथे दिनांक १४/१२/२०२२ चे ०८.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— ललीतकूमार निलकंट वांगे, वय ३५ वर्ष, रा. भोडे वर ता. उमरेड यास आरोपी नामे— मूरलीधर फकीरा केने, वय ५३ वर्ष, रा. सालईराणी ता. उमरेड याने फोन करून स्वत:चे राहते घरी बोलावून त्याला त्याचे महिलेसोबत असलेले अनैतिक सबंध उघड करण्याची धमकी देवून पाच लाख रूपयाची मागणी करून त्याचे शर्ट व पॅटचे खिशात हात टाकून जबरदस्तीने १००००/— रू. काढून घेतले ‘‘पोलीस स्टेशनला गेला तर तूझा मर्डर करीन’’ अशी धमकी दिली व उर्वरीत पैशाची फिर्यादीस फोनवर वारंवार मागणी केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम ३९२ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक ठेंगणे मो. न. ७९७२८१२५६९ करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. कुही** :— अंतर्गत २२ कि. मी. अंतरावरील मौजा पाचगाव कुही फाटा येथे दिनांक ३०/११/२०२२ चे दुपारी ०१.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— ग. भा. ज्योती रमाकांत ओल्लारवार, वय ३७ वर्ष, रा. चामोर्शी ता. चामोर्शी जि. गडचिरोली ही जगनाडे चौक नागपुर येथुन चामोर्शीला जाणाऱ्या बसमध्ये बसुन जात असतांना मौजा पाचगाव कुही फाटा येथे कंडक्टरला टिकीटीचे पैसे देण्याकरीता पर्स उघडला असता तिला पर्सची चैन उघडी दिसली तेव्हा तिने आपला पर्स चेक केला असता तिला दोन तोळे सोने नेकलेस किंमती अंदाजे ४०,०००/—रू., अडीच तोळे सोन्याची चैन किंमती अंदाजे ५०,०००/—रू. पाच ग्रॅम सोन्याचे झुमके किंमती अंदाजे १०,०००/—रू. एक तोळा पाच—पाच ग्रॅमची अंगुठी किंमती अंदाजे २६,०००/—रू. बाकी ज्वेलरी पाच ग्रॅम १५,०००/—रू. असा एकुण १,४१,०००/—रूपयाचा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कुही येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील पोलीस उपनिरीक्षक ठमके पो.स्टे कुही मो. नं. ८७८८५५३१३९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**